दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १५७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.३१ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com




# नोकरीचे अमिष दाखवून फसवणूक करणाऱ्याचा खून ; ७ आरोपी अटकेत

## उरण पोलिसांनी अवघ्या काही तासातच प्रकरणाचा लावला छडा

**दै.रायगड नगरी । उरण**

**उरण तालुक्यातील करंजा द्रोणागिरी हायस्कूलच्या पाठीमागे माळरान असलेल्या द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी काल २९ जुलै रोजी एका अज्ञात इसमाचा रशीने हातपाय बांधलेला मृतदेह आढळून आला होता. त्यामुळे चाणजे परिसरात मोठ्या प्रमाणात खळबळ निर्माण झाली होती. हा मृतदेह हातपाय बांधलेल्या अवस्थेत असल्यामुळे या व्यक्तीचा खून झाला असल्याचा प्रार्थ मिक अंदाज व्यक्त करण्यात येत होता.**

उरण पोलिसांना या प्रकरणी तपासात सर्वप्रथम मृतदेहाची ओळख पटली.त्यांनतर अवघ्या काही तासातच शिताफीने आरोपींनाअटक केली आहे. खून झालेल्या मयत इसमाचे नाव किरण सदानंद कडू (५५) रा. बेलापुर, शाहबाज मुळगाव नवघर –उरण असे आहे. ही व्यक्ती बेरोजगार तरूणांकडून नोकरी लावण्याच्या निमित्ताने पैसे उकळून फसवणूक करण्याचा धंदा करीत होता. या मयत इसमावर ठाणे आणि मुंबईमध्ये आर्थिक फसवणूकीचे गुन्हे दाखल होते.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या वृत्तानुसार गुन्ह्यातील मयत इसम किरण कडू याने करंजा गावातील बेरोजगार तरूणांकडून नोकरीला लावण्याचे अमिष दाखवून जवळ जवळ १९ ते २० लाख रूपये एवढी मोठी रक्कम उकळली होती. मात्र अनेक महिने उलटून गेल्यानंतरही या तरूणांना नोकरी मिळत नसल्याने त्यांनी आपले पैसे परत मिळविण्यासाठी किरणकडे तगादा लावला होता. तो पैसे देत नसल्यामुळे

उरण पोलिसांनी या प्रकरणी साहिल श्याम कोळी (२९) रा. कोंढरीपाडा, नयन मनोहर कोळी (१९)रा. कोंढरीपाडा, हिमांशु कैलास बंदरे (२५) रा. कासवलेपाडा, यश प्रेमानंद कोळी (२३) रा. कासवलेपाडा, विघ्नेश परशुराम कोळी (३०) रा. कोंढरीपाडा, राजेश बाबू कोळ (५०) रा. पनवेल कोळीवाडा, अभिजित हरिश्चंद्र चौगुले (२७)रा.डोलघर ता - पनवेल यांना अटक केली आहे.

संतापलेल्या चार तरूणांनी रविवारी किरण राहत असलेल्या नवीमुंबईतील सीबीडी – बेलापूर जवळील शाहबाज येथिल घरी गेले आणि तेथून त्याला गोड बोलून आपल्या स्विफ्ट कारमधून करंजा, द्रोणागिरी हायस्कूलच्या पाठीमागील द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्या जवळ आणले.

तेथे आणल्यानंतर ज्या बेरोजगारांचे पैसे बुडविले होते,त्यांच्या नातेवाईकांना तिथे बोलविण्यात आले. यावेळी झालेल्या वादात या सर्वांनी किरणला बेशुद्ध होईपर्यंत बेदम मारहाण केली. त्यानंतर तो शुद्धीवर येवून पळून जाऊ नये म्हणून त्याचे हातपाय बांधून



ठेवण्यात आले.काही वेळानंतर तो मरण पावला. ही घटना तेथील गुराख्याने पाहिली होती. त्यानी या बाबतची माहिती करंजा गावातील काही लोकांना दिल्यानंतर काही लोकांनी याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवित अवघ्या काही तासातच मुख्य आरोपींना ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखविताच या खूनाची कबूली दिली आणि या खूनात कोणाचा सहभाग होता, त्यांचीही माहिती दिली. या खून प्रकरणात बंदर विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सावंत, उरणचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक रविंद्र बुधवंत यांच्यासह त्यांच्या पोलिस पथकाने योग्य त्या दिशेने तपासाची चक्रे फिरवीत मोठ्या शिताफीने तपास करीत वरील गुन्ह्याचा तपास करून आरोपींना तात्काळ जेरबंद केले आहे. त्यामुळे उरण पोलिसांच्या या कामगिरीबद्दल सर्वच स्तरातून समाधान व्यक्त होत आहे.

# मंदिरे उघडण्यासाठी पनवेल शंखनाद आंदोलन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाचे निमित्त करत हिंदू धर्मातील सणांचे महत्व कमी करण्याचे काम राज्यातील महविकास आघाडी ठाकरे सरकारच्या माध्यमातून केले जात आहे. त्यामुळे मंदिरे उघडे करण्यासाठी व झोपी गेलेल्या ठाकरे सरकारला जागे करण्यासाठी आज (दि. ३०) पनवेलमध्ये भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आरती करून देवाला साकडे घालण्यात आले.

राज्यातील मंदिरे बऱ्याच काळापासून बंद आहेत. ही मंदिरे उघडावीत या मागणीसाठी भारतीय जनता पार्टीने आक्रमक भूमिका घेतली असून आज राज्यभरात ठिकठिकाणी शंखनाद आंदोलन करत मंदिरे उघडण्याची मागणी केली आहे. लॉकडाऊन शिथील करण्याच्या प्रक्रियेत राज्यभरात दारुच्या दुकानांना अधिकृत परवानग्या देण्यात आल्या. हॉटेल, बार, सुरु करण्यात आले आहेत मात्र मंदिर, धार्मिक स्थळांचे टाळे बंद ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल शहरातील विरुपाक्ष मंदिरात शंखनाद आंदोलन करून भक्तीचे दार उघड अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, गुरुनाथ लोंढे, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा वर्षा नाईक, नगरसेविका रुचिता लोंढे, माजी नगरसेविका निता माळी, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, संजय जैन, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, रवी नाईक, सुहासिनी केकाणे, सपना पाटील, निता मंजुळे,

.../४

## संक्षिप्त...

### अनधिकृत फेरीवाल्याचा पालिका सहाय्यक आयुक्तांवर चाकूने हल्ला

**दै.रायगड नगरी । ठाणे**

अनधिकृत फेरीवाल्यांर कारवाई करण्यासाठी गेलेल्या माजिवडा विभागाच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंगळे यांच्यावर भाजी विक्रेत्याने जीवघेणा हल्ला केला. या भाजी विक्रेत्याने पिंगळे यांच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. या हल्लयात पिंगळे या गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्या हाताची तीन बोटे तुलटी असल्याचे वृत्त आहे. त्यांच्या डोक्याला देखील गभीर जखम झालेली आहे.

अमरजीत यादव असे हल्लेखोर फेरीवाल्याचे नाव आहे. फेरीवाल्याच्या या हल्लयात रक्तबंबाळ झालेल्या कल्पिता इंगळे यांना तातडीने ठाण्यातील वेदांत रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांना गंभीर दुखापत झाल्याचे लक्षात येताच त्यांना तातडीने ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात हलवण्यात आले आहे. पिंगळे यांच्यावर हल्ला होत असल्याचे लक्षात येताच त्यांच्या अंगरक्षकाने त्यांना वाचवण्यासाठी धाव घेतली. मात्र, फेरीवाल्याने त्यांनाही लक्ष्य केले.

## मालमत्ता करासह पाणीटंचाई संदर्भात

# महाविकास आघाडीच्या शिष्ट मंडळाने घेतली आयुक्तांची भेट



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेने लागू केलेला मालमत्ता करासह अनेक ठिकाणी होत असलेल्या पाणी टंचाई संदर्भात आज (सोमवार दि.३० ऑगस्ट) पनवेल महानगरपालिकेत महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने पनवेल महानगरपालिकचे आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान मालमत्ता कर व पनवेल मधील पाणी प्रश्नावर चर्चा केली.

यावेळी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शिवसेना जिल्हा सल्लागार बबन पाटील, काँग्रेस कमिटी जिल्हाध्यक्ष आर.सी. घरत, पनवेल महानगरपालीकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, शिवसेनेचे तालुका संघटक भरत पाटील, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, यतीन देशमुख, पनवेल शहर प्रमुख अच्युत मनोरे यांच्यासह आदि पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नागरिकांवर लागू केलेल्या मालमत्ता करासंदर्भात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी संताप व्यक्त करून शासनाच्या माध्यमातून या करातून नागरिकांना योग्य मार्ग काढून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. त्याचप्रमाणे ऐन सणासुदीच्या दिवसात व चांगला पाऊस झाला असतानाही अनेक भागामध्ये पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्याबाबत योग्य उपाययोजना करून पनवेलकरांना पाणी टंचाईपासून मुक्त करावे, अशी मागणी सुद्धा या शिष्टमंडळाने आयुक्तांकडे केली आहे.

# कळंबोलीत फिरतात चिल्ड्रन बँकेतील शंभराच्या नोटा

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

**बनावट नोटांचे रॅकेट आपण सर्वत्र ऐकल आहे. बनावट नोटा छापून त्या चलनामध्ये वापरल्या जाण्याच्या घटना आपण वारंवार पाहतो. मात्र स्कूल प्रोजेक्ट साठी निर्माण केलेल्या शंभर रुपयाच्या नोटीची प्रतिकृती व त्यावर लिहिलेले चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया शंभर रुपयाच्या नोटा आता कळंबोली मध्ये खरोखरची नोट म्हणून वापरली जात आहे. याचा प्रत्यय एका सुशिक्षित महिलेला आल्याने खळबळ उडाली आहे.**

कळंबोलीतील एका सुशिक्षित महिलेला बाजारांमध्ये काही वस्तू खरेदी करीत असताना शंभराची बनावट नोट कोणाकडून मिळाली याची माहिती नसल्याने त्या चक्रावून गेल्या आहेत. सदरची बाब अन्य सहकाऱ्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली असता शंभराची नोट खऱ्या नोटे प्रमाणे असून त्यावर चिल्ड्रन्स बँक ऑफ इंडिया आणि ओन्ली युज फोर स्कूल प्रोजेक्ट असे त्यावर लाल अक्षरात लिहिलेले आहे.

## स्कूल प्रोजेक्ट नोटांचा चलनासाठी होतोय वापर

त्यावर महात्मा गांधीजींचा फोटो ही छापलेला आहे. नोट जरी दिसायला शासकीय चलनातील नोटे प्रमाणे असली तरी नोटेचा कागद हा लगेच कोणकोणत्या नोटांची प्रतिकृती बनावट म्हणून वापरली जात आहे त्याचा छडा लावणे तितकेच महत्त्वाचे आहे. शासनाने या बाबींकडे गंभीरपणे




हात लावला असता बनावट असल्याचे लक्षात येत आहे. सदरची बनावट नोट चलनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या शासकीय चंलनाप्रमाणे दिसत असल्याने नागरिकांची फसवणूक होत आहे. सद्यस्थितीत फक्त शंभराच्या नोटांची बनावट नोट नागरिकांच्या लक्षात आली आहे. अजून समाजामध्ये लक्ष देऊन स्कूल प्रोजेक्ट साठी वापरल्या जात असलेल्या नोटांच्या प्रतिकृती वर कायमची बंदी आणावी व स्टेशनरीच्या दुकानात जर स्कूल प्रोजेक्ट साठी वापरल्या जाणाऱ्या बनावट नोटांचा साठा असेल तर तो त्वरित जप्त करण्याची मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे.

# पेण तालुक्यातील बोर्वे येथे मुलाची गळफास घेऊन आत्महत्या

## आत्महत्येस कारणीभूत असलेल्या आरोपी महिलेला अटक

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्याच्या वडखळ हद्दितील बोर्वे गावात राहणाऱ्या १७ वर्षीय मुलाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली आहे. आत्महत्या करण्यास कारणीभूत असणाऱ्या आरोपी महिलेला पोलिसांनी अटक केली आहे.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, बोर्वे गावातील आर्यन गावंड हा १७ वर्षीय मुलगा गावातील तळ्यावर पोहण्यासाठी गेला होता. यावेळी खेळताना मस्ती मस्तीत गावातील मुलांबरोबर त्याचे भांडण झाले. यावेळी तेथे कपडे धुवत



असलेली आरोपी महिलेने आर्यनच्या कानशिलात देऊन शिवीगाळ केली. सर्वांसमोर इज्जत गेल्याचा मनात राग धरून आर्यनने घरातील माळ्यावर जाऊन कमरेला असणा–या पट्ट्याच्या साहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली.

या प्रकरणी वडखळ पोलिस ठाण्यात गु.र.नं. १४१/२०२१ नुसार भादवी कलम ३०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त करणा–या आरोपी महिलेला वडखळ पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने तीला १४ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. याबाबत पोलिस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली वडखळ पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी नाना पटोले यांचे घेतले आशीर्वाद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी कामगारनेते महेंद्रशेठ घरत यांची निवड झाल्या बद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. या वेळी नाना पटोले यांनी नवनियुक्त रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांचे अभिनंदन केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संपूर्ण जिल्हा पिंजून काढून जिल्ह्यात काँग्रेस कार्यकर्त्यांना पक्ष बांधणी साठी सर्व सेलच्या अध्यक्षांना सोबत घेऊन जिल्हा दौरा करण्याच्या सुचना दिल्या आहेत. व आजपासूनच जिल्हा अध्यक्ष

.../४

# या निशा सर्वभूतानां...

आधी लष्करातून देशसेवा, त्यानंतर ग्रामविकास आणि पुढे अनेक दशके भ्रष्टाचाराच्या विरोधात तसेच माहितीच्या अधिकारासाठी मोठमोठी आंदोलने.. अशी प्रदीर्घ वाटचाल करणारे समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे आता मावळतीच्या पर्वात समाजावरच नाराज झाले आहेत. 'देश बचाव जन आंदोलना'चे तरुण कार्यकर्ते अण्णांच्या अहमदनगर जिल्ह्यातील राळेगण सिद्धी या कायापालट झालेल्या गावात त्यांना भेटायला गेले होते. देशात आंदोलने व्हावीत, असे अनेक विषय सध्या तापलेले आहेत. उत्तर भारतात तर शेतकऱ्यांचे आंदोलन विक्रमी काळ चालू आहे. या सगळ्या आंदोलनांना अण्णांनी मार्गदर्शन करावे किंवा त्यांचे नेतृत्व करावे, अशी या तरुणांची इच्छा होती. त्यांच्याशी बोलताना अण्णांनी 'आपली जनताच कुंभकर्णासारखी झोपली आहे. मी एकटा काय करू? आता माझे वय ८४ झाले आहे,' अशी उद्वेगखंत व्यक्त केली. अण्णांच्या या भावना समजावून घ्यायला हव्यात. अण्णांच्या या त्राग्यामागे त्यांच्यावर होणाऱ्या पक्षपाताच्या आरोपाचीही वेदना आहे. अण्णा काँग्रेस किंवा मित्रपक्षांची सरकारे असली की आंदोलने उभी करतात आणि भाजप किंवा त्यांच्या मित्रपक्षांची सरकारे आली की झोपी जातात. मग नंतर त्यांना एकदम काँग्रेसचे सरकार आले की जाग येते, अशी टीका समाज माध्यमांमध्ये गेले काही महिने सातत्याने होते आहे. ती टीका अण्णांपर्यंत पोहोचली असणारच. मात्र, ही टीका वस्तुस्थितीला सोडून आहे, हे नोंदवायला हवे. १९९५ मध्ये शिवसेना-भाजप युतीचे पहिले सरकार सत्तेवर आले, तेव्हा महादेव शिवणकर हे भाजपचे आणि शशिकांत सुतार व बबनराव घोलप हे शिवसेनेचे असे तीन मंत्री अण्णांच्या आरोप व आंदोलनामुळे घरी गेले होते. पुढे अनेक पक्ष फिरून येणाऱ्या काही नेत्यांच्या विरोधात अण्णांनी आझाद मैदानातही बेमुदत उपोषण केले होते. डॉ. मनमोहन सिंग हे पंतप्रधान असताना अण्णांच्या पुढाकाराने झालेले देशव्यापी आंदोलन तर सर्वांना परिचित आहे. मात्र, आज पुन्हा अण्णांनीच या वयात हातात आंदोलनाचा झेंडा घ्यावा, ही अपेक्षा काहीशी अस्थानी आहे. अण्णांना आता 'सांगेन गोष्टी युक्तीच्या चार' असे वाटले तर त्यात काही गैर नाही. गेली सात वर्षे केंद्रात मोदी सरकार आहे. दिल्लीतही अरविंद केजरीवाल यांची सत्तेची दुसरी खेप चालू आहे. ही दोन्ही सरकारे येण्याआधी जो जनक्षोभ निर्माण झाला होता; तो निर्माण होण्यात अण्णा हजारे आणि त्यांच्या आंदोलक साथींचा मोठा वाटा होता. मात्र, सत्तेत येण्यापूर्वी ज्यांना अण्णा पूजनीय आणि प्रात:स्मरणीय वाटत होते; त्यांनी आता अण्णा हजारे यांच्या पत्रांनाही उत्तरे देऊ नयेत, यात काही जगावेगळे घडलेले नाही. अण्णांच्या महाराष्ट्रातील तसेच देशातील आंदोलनांमुळे चांगले कायदे झाले. अनेक जणांवर खटले भरले गेले. काहींना शिक्षाही झाल्या. हे सगळे खरे असले तरी या आंदोलनांचा राजकीय लाभ कसा करून घ्यायचा किंवा त्यात कसे घुसायचे, याची गणिते अनेक हुशार नेते, पक्ष आणि संघटनांनी वेळोवेळी अचूक सोडविली आहेत. आता त्यांना अण्णा नकोसे झाले आहेत. काही दिवसांपूर्वी अण्णांनीच 'आपण विविध सरकारांना पाठविलेल्या पत्रांना' कशी उत्तरे दिली जात नाहीत, हे सांगितले होते. अण्णा हजारे यांनी महाराष्ट्रात आरंभ करून भ्रष्टाचार हा मुद्दा देशाच्या सार्वजनिक परिचर्चेत आणला, हे त्यांचे मोठे श्रेय आहे. आता या वयातही त्यांनीच ही लढाई लढत राहावे, ही अपेक्षा जशी चूक आहे; तशीच ती या लढ्याचे अपुरेपण दाखविणारी आहे. भारतीयांची मानसिकता व्यक्तिकेंद्री आणि व्यक्तिपूजक असल्याने भ्रष्टाचार निपटण्यासाठी किंवा सुशासन येण्यासाठी लोकमताचा दबाव टाकणारी कोणतीही संघटनात्मक बळकट बांधणी झालेली नाही. ज्या संघटना बांधल्या गेल्या; त्यांची विश्वासार्हताही अनेकदा प्रश्नांकित झाली. अण्णा हे काही प्रातिभ संघटक किंवा नेते नाहीत. ते राष्ट्रीय लढ्यांचे प्रतीक जरूर बनले. स्वच्छ प्रतिमा, निस्वार्थी समाजसेवा आणि समाजाप्रतीची आंतरिक कळकळ ही अण्णांची ताकद आहे. ती अनेकांनी वापरून घेतली. देशापुढचे प्रश्न आणि त्यावरची उत्तरे अनेकदा गुंतागुंतीची असतात. मोठे लढे उभे राहतात, तेव्हा ही उत्तरे सोपी वाटतात किंवा तशी ती असल्याचे भासविले जाते. केजरीवाल आदींनी नेमके हेच केले. पण अशा आंदोलनांमधून जे साधते ते समाज शहाणा झाल्याशिवाय फलदायी होत नाही. माहितीच्या कायद्याचे उदाहरण त्यासाठी पुरेसे आहे. अण्णांची खंत ती हीच आहे. समाजाचे जागरण आणि लोकशिक्षण सतत व्हावे लागते. क्षणिक उद्रेकांमधून सत्तांतरे होतात; समाज बदलत नाही. भगवान श्रीकृष्णांनी गीतेत 'या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी' असे म्हटले आहे. म्हणजे, लोक झोपलेले असतात, तेव्हा शहाणी माणसे जागी राहतात. पण जागरणाची सारी जबाबदारी त्यांच्यावर टाकून कसे चालेल? राळेगणला जाऊन अण्णांना साकडे घालण्यापेक्षा समाजाने जागे राहून जागोजागी न्यायासाठी लोकलढे उभारणे, हाच खरा मार्ग आहे.

# मुंबई-गोवा महामार्गावर मोकाट गुरांचा हैदोस, वाहन चालक त्रस्त

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग १७ वरील कोलाड, खांब, सुकेळी वाकण दरम्यान मोकाट गुरांच्या वाढत्या संख्येमुळे वाहन चालक त्रस्त झाले असुन यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे यामुळे संबंधित व्यक्तिकडून लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या जवळील मोठ्या प्रमाणावर शेत जमीन मुंबई-पुणे येथील धनिकांना विकल्या असुन भाताचे कोठार म्हणून संबोधला जाणारा रायगड जिल्ह्यात भातशेतीची लागवड क्षेत्र कमी झाले आहे.ज्या शेतकरी वर्गाची शेती आहे त्यांनी आपली भात शेतीची लावणी पुर्ण झाल्यावर आपल्याजवळील असणारी गुरे मोकाट सोडलेली आहेत.

ज्या धनिकांना शेतकऱ्यांनी शेती विकल्या आहेत त्या धनिकांनी या शेतजमिनी भोवती तारेचे कुंपण घातले आहे. यामुळे गुरे चरण्यासाठी जागा उरली नाही. यामुळे मोकाट सोडलेली गुरे ही मुंबई गोवा हायवे वर रस्त्यातच बस्तान मांडत आहेत. वाहन चालकांना रस्त्यात उभ्या असणाऱ्या मोकाट गुरांमुळे मार्ग काढतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर एखाद्या ग्रुांना अपघात झाला तर त्याची भरपाई करण्यासाठी हा गुराखी मालक धावून येतो.याउलट या ग्रुांमुळे वाहन चालकाला अपघात झाला तर तो फिरकतही नाही अशा मोकाट ग्रुरांचा बंदोबस्त संबंधितांकडून करण्यात यावे अशी मागणी वाहन चालक यांच्याकडून करण्यात येत आहे.

# लिलाधर भोईर मुख्य यांत्रिक इंजिनिअर ॲवॉर्डने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा वसाहत परिसरात राहणारे शिवसेना पदाधिकारी व कामगार नेते लिलाधर भोईर यांना पश्चीम रेल्वेच्या ६६ व्या रेल्वे सप्ताहात रोलीग स्टॉंक विभागात २०२०- २०२१ मध्ये सर्वोत्तम कार्य करणार्या रेल्वे कर्मचार्याना आज प्रमुख मुख्य यात्रिक इंजिनियर हा मानाचा अँवार्ड देऊन गौरविण्यात आले.पश्चिम रेल्वेच्या महालक्ष्मी वर्कशाँप मध्ये कार्यरत असणारे लिलाधर भोईर (टेक्निशियन ग्रेड) याच्या विषेश कामावर प्रभावित होऊन,तसेच कोरोना काळात रेल्वे कर्मचार्यांसाठी दिलेल्या योगदानासाठी लिलाधर भोईर याना सिल्व्हर मेडल आणी प्रशस्तीपत्र देऊन त्याना गौरविण्यात आले. हा सोहळा पश्चिम रेल्वेचे मुख्यालय चर्चगेट येथे अशेष अग्रवाल यांच्या हस्ते पार पडला. लिलाधर भोईर यांच्यावर सर्व कामगारातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे. लिलाधर भोईर हे कामगार नेते सुध्दा आहेत . नुकत्याच गुजरात(बडोदा) येथे पार पडलेल्या पश्चिम रेल्वे ऑल इंडिया ओ बी सी असोशिएशन च्या अधिवेशनात त्याची झोनल एक्झीक्युटिव मेम्बर, ऑफीस सेक्रेटरी म्हणुन बिनविरोध निवड झाली आहे. ते महालक्ष्मी वर्कशाँप ब्रँचचे अध्यक्ष आहेत. त्यांनी हा पुरस्कार ज्याच्या मार्गदर्शनाने ते भारतीय रेल्वेत कामाला लागले असे देविदास गोविंद पाटिल (दादा)याच्या चरणी अर्पण करीत असल्याचे सांगितले.




भटक्या विमुक्त भाजपच्या म्हसळा तालुक्याच्या अध्यक्षपदी मधुकर रिकामे यांची नियुक्ती केल्याचे पत्र देत असताना भाजप नेते कृष्णा कोबनाक

# सावळे ग्रामपंचायतीमार्फत ग्रामस्थांचे मोफत लसीकरण




**दै.रायगड नगरी । पनवेल**

सावळे ग्रामपंचायत ही नेहमीच आदर्शवत लोकोपयोगी उपक्रम राबवत असते. सावळे ग्रामपंचायत हद्दीतील वय वर्षे ४० च्या पुढील व दिव्यांग नागरिकांना मोफत कोविशिल्ड लसीचा पहिला डोस देण्यात आला.

ग्रामपंचायत सावळेच्या स्व उत्पन्नातून गावामध्ये वय वर्षे ४० च्या पुढील व दिव्यांग नागरिकांना मोफत कोविशिल्ड लसीचा पहिला डोस मोफत देण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सरपंच प्रशांत नरेश माळी, उपसरपंच कांता कांबळे, सदस्य सुनील माळी, सतीश म्हस्कर, संजय केदारी, रश्मी गाताडे, प्रगती जांभुळकर, कांता माळी, सुरेखा कुरंगळे व ग्रामसेवक सतीश देवकते व गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# नगरसेवक नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत कोरोना लसीकरण शिबिर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेचे नगरसेवक तथा भाजप शहर सरचिटणीस नितीन पाटील यांचा वाढदिवस रविवारी (दि. २९) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल शहरातील गोखले सभागृहात मोफत लसीकरण शिबिर घेण्यात आले. या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या माध्यमातून करण्यात येणार्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

जाणिव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असलेले नितीन पाटील यांच्या माध्यमातून नागरिकांच्या हिताचे अनेक सेवाभावी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असतात. आपल्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक पाटील यांच्या वतीने कोरोनाच्या वाढत्या प्रादुभार्वाच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील गोखले सभागृहात कोरोना प्रतिबंधात्मक लसीच्या मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५० नागरिकांचे लसीकरण करण्यात आले.

या उपक्रमास पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, माजी नगरसेवक डी. आर. भोईर, नीता माळी, वॉर्ड अध्यक्ष चंद्रकांत पाटील, महिला मोर्चाच्या लीना पाटील, प्रसाद हनुमंते, उमेश इनामदार, प्रितम म्हात्रे, श्रुती मराठे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी नगरसेवक नितीन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरसेवक नितीन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सामाजिक जाणिवेतून नागरिकांच्या हितासाठी त्यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार्या उपक्रमांचे कौतुक केले तसेच सामाजिक उपक्रम सातत्याने सुरू ठेवत जनसेवा करीत राहा, असे सांगितले.

त्यांनी या वेळी कोरोना महामारीच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या कार्याचाही गौरव केला.

**नावात बदल**

**माझे जुने नाव शगुफता शेहजाद फकी असे होते. यापुढे नवीन नाव शगुफता शेहजाद फकीह असे राहील. सदर नावाची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.M 2148058 दिंक ५/८/२०२१ ते ११/०८/२०२१ ह्यात नोंद आहे.**

**नवीन नावे सही/-**
**शगुफता शेहजाद फकीह**
**रा.तय्यब चाळ, एम.जी.रोड,**
**कच्छी मोहल्ला, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मंदिरे उघडण्यासाठी पनवेल शंखनाद आंदोलन

केदार भगत, गौरव कांडपिळे, आकाश भाटी, राजन पेठे, देवांशु प्रभाले, कादीर शेख, कर्वे गुरुजी, समिर ओझेयांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, कोरोनाचा प्रादुर्भाव आणि रुग्ण संख्या कमी झाली आहे. अशा परिस्थितीत जनजीवन जवळपास पूर्ववत सुरू झाले आहे. ठाकरे सरकारने मांस, मदिरा सर्वकाही सुरू केले परंतु संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्रात 'हरी' ला मात्र बंदिस्त करून ठेवले आहे. लोकांच्या भावनेचा विचार न करता हम करो सो कायद्याने राज्यातील सरकार कारभार करीत असून सर्वे धार्मिक स्थळे व मंदिरे भाविकांसाठी खुली झालीच पाहिजे अशी जोरदार मागणी यावेळी त्यांनी केली. 'भाविक भक्तांना जेल, गुन्हेगारांना बेल' असा ठाकरे सरकारचा कारभार सुरू आहे. केंद्र सरकारने ४ जून २०२० रोजी यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून त्यानुसार देशभरातील बहुसंख्य प्रमुख देवस्थानेसुद्धा सुरू केलेली आहेत. राज्यातही सामाजिक अंतर राखून आवश्यक नियम अटी शर्तीसह देवस्थाने धार्मिक स्थळे सुरु करण्याची तसेच भजन, कीर्तन व पूजन करण्याची आग्रही मागणी भाविक भक्तांकडून होत आहे. मात्र पुनश्च 'हरिओम' म्हणून हरीला बंदिस्त करून ठाकरे सरकार कुंभकर्णी अवस्थेत गेले आहे. त्यांना जागे करण्यासाठी जागोजागी आंदोलने होत असून मंदिरे दर्शनासाठी खुली करा, अशी मागणी सातत्याने होत आहे. यावेळी 'मंदिर बंद उघडले बार उद्धवा धुंद तुझे सरकार', 'मंदिर बंद गरिबांचे हाल ठाकरे सरकार मालामाल', 'भक्तो को जेल मंदिरोपर ताला उद्धव सरकार मे शराब का बोलबाला', अशा जोरदार घोषणा देऊन महाविकास आघाडी सरकारचा निषेध व्यक्त करण्यात आला.

## रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी नाना पटोले यांचे घेतले आशीर्वाद

म्हणून आपण कामाला लागावे. अश्या प्रकारच्या सुचना नाना पटोले यांनी महेंद्र घरत यांना दिल्या. यावेळी रायगड जिल्हा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सौ. श्रद्धा ताई ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, पनवेल तालुका काँग्रेसचे अध्यक्ष महादेव कटेकर, खालापूर काँग्रेसचे अध्यक्ष नाना म्हात्रे, अलिबाग तालुका अध्यक्ष योगेश मगर, श्रीवर्धन तालुका काँग्रेसचे अध्यक्ष आझाद भाई, उरण तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सौ. रेखाताई घरत, अलिबाग महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सौ. सुजाता पाटील, निर्मला पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विनोद म्हात्रे कृष्णा पारंगे, कोकण विभाग मच्छिमार सेलचे अध्यक्ष मार्तंड नाखवा, अखलाक शिलोत्री, उरण तालुका इंटक अध्यक्ष संजय ठाकूर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## जाहिरात

### आदिवासी विकास विभाग

### प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण जि.रायगड

प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण जि.रायगड या कार्यालया अंतर्गत असलेल्या केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना **अ गटातील उत्पन्न निर्मितीच्या योजना** सन २०२१-२२ मध्ये राबविणेकामी प्रकल्प कार्यालय अंतर्गत येणाऱ्या तालुक्यातुन आदिवासी लाभार्थ्यांकडुन योजना निहाय अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक लाभार्थ्यांना योजनानिहाय आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन आपले अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण जि.रायगड येथे जमा करावेत. विहित मुदतेत आलेल्या अर्जाचाच सदर योजनांसाठी विचार करण्यात येईल. सदर अर्ज कार्यालयात दिनांक ३१/१०/२०२१ पर्यंत जमा करावेत. तसेच दिनांक ३१/१०/२०२१ नंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**सन २०२१-२२ केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) अंतर्गत प्रस्तावित योजनांची नावे**

| अ.क्र. | योजनेचे नाव | गट | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जमातीच्या बचत गटांना/गटांना विटभट्टी व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | अ | न्युबयो |
| २ | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना DBT/ द्वारे भाजीपाला व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. | अ | न्युबयो |
| ३ | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना ढाबा चालविणेसाठी अर्थसहाय्य देणे. | अ | न्युबयो |
| ४ | आदिवासी मत्सव्यवसाय सहकार संस्था/बचत गटांना यांत्रिकी बोट व मत्सजाळे पुरवठा करणे. | अ | न्युबयो |
| ५ | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना मच्छिमार व्यवसाय करणेसाठी जाळी/इतर साहित्य खरेदी करणेसाठी अर्थसहाय्य देणे. | अ | न्युबयो |

**अटी व शर्ती**

१) लाभार्थी अनुसूचित जमातीचा असावा. २) जातीचा दाखला (छायांकीत प्रत) ३) आधार कार्ड (छायांकीत प्रत) ४) मोबाईल क्र. ५) रहिवासी दाखला ६) रेशन कार्ड ७) राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असावे (IFSC कोडसह) ८) यापुर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा. ९) अर्जाचा नमुना प्रकल्प कार्यालय पेण येथे विनामुल्य मिळेल.

**उपरोक्त, पात्रते व्यतिरीक्त खालीलप्रमाणे योजना निहाय कागदपत्र आवश्यक आहेत.**

**१) योजना क्र. १.** वरील अटी व शर्ती १) एकुण १० लाभार्थी मिळुन गटाची योजना आहे १० लाभार्थ्यांना स्वतंत्र अर्ज भरुन सादर करणे अनिवार्य राहील. २) बचत गट/ गट स्थापन केल्याचा दाखला ३) विटभट्टी करण्यासाठी संबंधीत गटाची स्वत:ची अगर खाजगी जागा भाडेतत्वार घेतलेले संमतीपत्र प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे. ४) गटाचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे (अध्यक्ष व सचिव यांचे नावे जॉईंट खाते) ५) ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला असावा.

**२) योजना क्र.२ -** वरील प्रमाणे अटी व शर्ती तसेच भाजीपाला व्यवसाय कुठे सुरू करायचा आहे त्याबाबत हमीपत्र असावे. व राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असावे (IFSC कोडसह).

**४) योजना क्र.३ -** वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती व सदर योजनेअंर्तगत ढाबा चालवणेसाठी स्वत:ची जागा किंवा भाडेतत्वार जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. व राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असावे (IFSC कोडसह).

**५) योजना क्र. ४-** वरील अटी व शर्ती १) एकुण १० लाभार्थी मिळुन गटाची योजना आहे १० लाभार्थ्यांना स्वतंत्र अर्ज भरुन सादर करणे अनिवार्य राहील. २) बचत गट/ गट स्थापन केल्याचा दाखला ३) ज्या ठिकाणी मत्स व्यवसाय करावयाचा आहे त्याबाबतचे सहमतीपत्र आवश्यक आहे. ४) डॉम/तलाव येथे मत्स व्यवासाय करणार असल्यास त्या ठिकाणाचा किमान दोन वर्षाचा करारनामा ५) गटाचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असावे (अध्यक्ष व सचिव यांचे नावे जॉईंट खाते) ६) ग्रामपंचायतीचा नाहरकत दाखला असावा.

**६) योजना क्र.५ -** वरील प्रमाणे अटी व शर्ती व राष्ट्रीयकृत बँकेचे खाते असावे (IFSC कोडसह).

**स्वाक्षरी/-**
**(श्रीम.शशिकला अहिरराव)**
**प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प**
**पेण, जि.रायगड**

**विमाका/कोवि/२०२०-२०२१/१३१**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## श्रावणी सोमवार निमित्ताने महापूजेचे आयोजन



**दै.रायगड नगरी । माथेरान**

श्रावणी सोमवार निमित्ताने येथील संत गाडगे महाराज रोड रेल्वे स्टेशन परिसरातील प्रति पिसारनाथ महाराज मंदिरात अभिषेक आणि महापूजेचे आयोजन करण्यात आले होते.

नुकताच या मंदिराच्या परिसराचे सुशोभीकरण विद्यमान नगरसेवक संदीप नारायण कदम यांच्या प्रयत्नातून झाले असून रेल्वे स्टेशन लगत असल्याने याठिकाणी पर्यटक सुध्दा आवर्जून भेट देत असतात. महापूजेचे औचित्य साधून या प्रभागातील नगरसेविका (शिक्षण सभापती ) प्रतिभा घावरे यांनी मुलांना खेळाचे साहित्य (कॅरम, क्रिकेटचे साहित्य, बॅटमिंटन, बुद्धिबळ) देण्यात आले. या वेळी श्रीराम प्रासादिक भजन मंडळाचा सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी माथेरान नगरपरिषदेचे कार्यसम्राट उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, नगरसेवक चंद्रकांत जाधव, माजी नगरसेवक प्रदिप घावरे, नगरसेवक संदीप कदम व माजी नगरसेवक अरविंद शेलार सामाजिक कार्यकर्त्या अमृता कदम व सुवर्णा कदम यांसह अन्य स्थानिक रहिवासी मोठया संख्येने उपस्थित होते.

# खाजगी शाळांच्या समस्यांबाबत संघटनेनी घेतली शिक्षणाधिकारी व सीईओची भेट

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

रायगड जिल्ह्यातील खाजगी प्राथमिक शाळा कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत आज रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्यावतीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. किरण पाटील, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानदा फणसे आणि वेतन पथक प्राथमिक आलिबाग या सर्वांची भेट घेऊन सदरील समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी आज संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले. या निवेदन प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष संदीप कदम, उपाध्यक्ष सुधाकर जैवल, मीनाक्षी कर्वे, कार्याध्यक्ष साईनाथ गावंड, सरचिटणीस यशवंत मोकल, कोषाध्यक्ष संतोष बारी, सल्लागार विनायक धाटावकर, विकास मांढरे, प्रसिद्धीप्रमुख धनाजी घरत, संघटक ज्ञानेश्वर ठाकूर, सुगिंद्र म्हात्रे, मेघा मोरे, संतोष जाधव, सचिन सावंत, दीपक सूर्यवंशी, देवेंद्र केळूसकर आदी सह संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी दिलेल्या निवेदनामध्ये संघटनेने असे म्हटले आहे की माहे जून २०२१ चे प्रलंबित वेतन, प्रभारी मुख्याध्यापक सहीचे अधिकार देण्यास विलंब झाला व काही शाळांच्या आर. टी. ई मान्यता घेण्यास विलंब झाला या त्रुटींमुळे वेतन रिजेक्ट करण्यात आली आहेत. ते प्रलंबित वेतन तात्काळ मंजूर करावे. त्याचबरोबर माहे जुलै व ऑगस्टचे पगार गणेशोत्सवापूर्वी होणे आवश्यक आहे. तसेच वेतन पथकातील प्रलंबित रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत, २०१७ पूर्वी वरिष्ठ वेतन श्रेणी निवडश्रेणी पात्र कर्मचारी यादी घोषित करणे, वरिष्ठ वेतन श्रेणी निवड श्रेणी करिता प्रशिक्षणाची व्यवस्था करणे आदी विषयासंदर्भात निवेदन देऊन संघटनेच्या मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे मागणी केली आहे.



खाजगी शाळेतील शिक्षकांच्या आर. टी. ई मान्यता, शिक्षक सहीचे अधिकार व मुख्याध्यापक सहीचे अधिकार तसेच वेतन खात्यातील रिक्त जागा यासारखे विविध प्रश्न सोडविण्यासाठी मी नक्की सहकार्य करणार तसेच खाजगी शाळेतील शिक्षक व सर्व कर्मचारी यांनी लसीकरण करून घ्यावे यासाठी मी आरोग्य केंद्रांना सूचना दिल्या आहेत तसेच आपला जिल्हा ज्ञानरचनावाद जिल्हा म्हणून पुढे आला पाहिजे यासाठी प्रत्येक शाळेतील मुलगा सक्षम व परिपूर्ण होणे काळाची गरज ओळखून आपण सर्व शिक्षकांनी यासाठी परिश्रम घेऊन शाळांमध्ये रेडिओ पच्या माध्यमातून प्रत्येक मुलगा शिक्षणाच्या प्रवाहात येऊन आदर्श विद्यार्थी होण्यासाठी शिक्षकांनी या प्रवाहात झोकून काम केले पाहिजे.

**डॉ.ज्ञानदा फणसे, प्राथमिक शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा.**

प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी तात्काळ वेतन पथक अधीक्षकांची नेमणूक करण्यासाठी आजच्या आज शिक्षण उपसंचालक यांच्याशी बोलून समस्या सोडवण्यासाठी नक्की मदत करणार व गणेशोत्सापूर्वी शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न निकाली काढणार.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**डॉ. किरण पाटील**

# कोरोना काळात येणारे सण उत्सव साधेपणात साजरे करावेत : अनिल घायवत

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

गेली दोन वर्षे आपण सारेजन कोरोना संकटाशी सामना करत आहोत आज देखील त्याचा संसर्ग रोखण्यासाठी काटेकोरपणे प्रयत्न करत आहोत कोरोना संसर्ग कमी असेल परंतु धोके पुन्हा उद्धभऊ शकतात हिंदू संस्कृतीचे पुढे येणारे सण उत्सव हे आनंदाने साजरे करा परंतु कोरोना संसर्गाचा काटेकोरपणे तसेच शासकीय नियमांचे पालन करून ते साजरे करावेत असे प्रतिपादन कोलाड विभागीय पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक अनिल घायवत यांनी चिल्हे येथे केले.

येणारे दहीहंडी व गणेशोत्सव सण उत्सव हे गावोगावी कोरोनाचे पालन करून करावेत तसेच अनुसूचित प्रकार घडू नयेत याकरिता कोलाड विभागात कोलाड विभागीय पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड पोलीस पथक गावोगावी भेट देत याची माहिती देत असून रोहा तालुक्यातील मौजे चिल्हे येथील भेटी दरम्यान ग्रामस्थांना मार्गदर्शन करतांना कोलाड पोलीस उप निरीक्षक घायवत हे बोलत होते .

यावेळी त्यांच्या समावेत पोलीस रामचंद्र ठाकूर, गावचे पोलीस पाटील गणेश महाडिक, ग्राम पंचायतीचे माजी सरपंच धनाजी लोखंडे, मारुती खांडेकर सर, प्रथम नागरिक रघुनाथ कोस्तेकर, सुनील महाडिक, प्रमोद शिंदे, गाव कमिटीचे अध्यक्ष सुधीर लोखंडे, सेक्रेटरी तुकाराम महाडिक, खजिनदार अनंत लोखंडे, रमेश महाडिक, ज्ञानेश्वर लोखंडे, मंगेश लोखंडे, संदीप लोखंडे, आदी ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित पुढे म्हणाले की कायदा आणि सुव्यवस्था तसेच सूचनांचे पालन करत गावात सण आणि उत्सव साजरे केले जातील याची दक्षता घ्यावी असे मोलाचे मार्गदर्शन यावेळी केले.

# चुका सुधारण्यासाठी शिवसेनेतर्फे तहसीलदारांना निवेदन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महावितरण विरोधात हल्ली विजसेवा म्हणजे अत्यावश्यक सेवा असून म्हसळा शहरांत व ग्रामिण भागात सतत विजपुरवठा खंडीत होत आसल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

तालुक्यात सुमारे १९ हजार २५६ ग्राहक आहेत यामध्ये घरगुती, व्यापारी, औद्योगिक या सर्व प्रकारचे ग्राहक आहेत. तालुक्यातील सर्व ग्राहकांच्या म.रा.वि.वितरण कंपनी विरुद्ध जोरदार तक्रारी आहेत त्यामुळे या सर्व ग्राहकां साठी शिवसेना पुढे सरसावली असून म.रा. वि.वितरण कंपनीने आपल्या सेवेत तात्काळ सुधारणा कराव्या,येणारी भरमसाठ वाढीव विजबिले, ग्रामिण भागात आंबा- काजू बागायतीत चुकीचे वीज वाहनामुळे लागणारे वणवे ह्या सर्व प्रकाराना तात्काळ निर्बंध घालावे, ग्रामिण भागातील पथदिवे तात्काळ सुरु करावे, कर्मचारी, अधिकाऱ्यांचा उध्दटपणा थांबवावा अशा मागण्या स्थानिक शिवसेनेने तहसीलदार, पोलीस निरीक्षक, ग.वि.अ.पंचायत समिती म्हसळा व उपअभियंता म.रा.वि.मं.यांच्याकडे दिले आहे.

निवेदन देण्यासाठी माजी सभापती महादेव पाटील, रविन्द्र लाड, कृष्णा म्हात्रे, विरेंद्र सावंत, पांडुरंग सावंत, अनंत शेडगे, हेमंत नात्ती, वितास खेडेकर, मेघश्याम खेडेकर आदी शिवसैनिक होते.

# खांदा वसाहतीमध्ये घरफोडीत सोन्याचे दागिने लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत लाकडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे.

स्वप्नील पाटील (३५ रा.मन्नारी को.ऑप.हौ.सो. रुम नं.बी १०८, से.१३) यांच्या बंद घराचे लाकडी दरवाजाचा कडी-कोयंडा अज्ञात चोरट्याने तोडून आत प्रवेश करून बेडरुममधील लाकडी कपाटात ठेवलेले विविध प्रकारचे सोन्याचे दागिने ज्याची किंमत जवळपास ७३ हजार रुपये इतकी आहे. चोरुन नेले आहे. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : वाघाची वाडी, ता.पनवेल, जि.रायगड येथील श्री.प्रसन्ना विश्वास आचरेकर, यांचे नावे असलेल्या ताबे कब्जातील तसेच मालकी हक्काच्या खालील वर्णनाच्या मिळकत आम्ही कायमस्वरुपी खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : वाघाची वाडी, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र चौ.मी. | आकारणी | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ८/३/४८ | ०-०७-५० | ७५.०० | श्री.प्रसन्ना विश्वास आचरेकर |
| उपरोक्त वर्णन केलेली मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे. | | | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे क्षेत्र हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत वर नमूद मिळकत मालकांचे म्हणणे आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, मृत्यूपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तरी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या लाभांत सोडून दिलेला आहे असे समजून आमचे व्यवहार पूर्ण करू व मागाहून आलेली तक्रार आमचेवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, कळावे.

पनवेल
दि.१४/०८/२०२१

**सही/-**
**श्री.भूषण बळीराम आंग्रे**
**रा.पायोनिअर सोसायटी, पद्मावती**
**सी.एच.एस. नित्यानंद मार्ग,**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८१०८११४८११**



श्री.भाकरे साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील : ॲड.सौ.अनघा अ. कानिटकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१००७/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.०६/१०/२०२१

श्रीमती.गिरिजा चंद्रमोहन गोडबोले
पुर्वाश्रमीची सुजाता अशोक नगरकर — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.पुष्पलता प्रभाकर गोडबोले वगैरे ३ — सामनेवाले

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी प्रस्तुतचे अर्जातील अर्जदार श्रीमती.गिरिजा चंद्रमोहन गोडबोले पुर्वाश्रमीची सुजाता अशोक नगरकर यांनी भारतीय वारसा अधिनियम १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दि.चौ.अर्ज क्र.१००७/२०२१ दाखल केला आहे. सदरहू अर्जामध्ये अर्जदार यांचे पती कै.चंद्रमोहन प्रभाकर गोडबोले हे दि.१९ मे २०२१ रोजी सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल पनवेल येथे मयत झाले आहेत.

कै.चंद्रमोहन प्रभाकर गोडबोले यांची स्वकष्टार्जित स्थावर मिळकत असून सदर मिळकत त्यांनी दि.२५ नोव्हेंबर १९९७ रोजीच्या खरेदीखताने (दस्त क्र.२४६०/१९९७) विकत घेतली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.२०२, (जुना ६) दुसरा मजला, बागेश्री को.हौ.सो., नित्यानंद मार्ग, गोखले हॉल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ | ५१० स्क्वे. फुट |

उपरोक्त स्थावर मिळकत अर्जदारांच्या नावे होणेकरिता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारास वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित किंवा अन्य कोणाची काही हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आमच्याकडे नमूद पत्यावर पुराव्याचे सर्व कागदपत्रासहीत येवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा या अर्जाची चौकशी करून अर्जदार यांना योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे जाहीर करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली आहे.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



अर्जदारतर्फे वकील ॲड.प्रगती म्हात्रे

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.७०/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०९/२०२१

सौ.सावित्री दामोदर गोंधळी वगैरे — अर्जदार

विरुद्ध

श्री.पंढरीनाथ मोरेश्वर ठाकूर — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.मोरेश्वर पांडु उर्फ पांडुरंग ठाकूर यांचे वारस म्हणून वारसदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै.मोरेश्वर पांडु उर्फ पांडुरंग ठाकूर हे दि.२२/०९/१९९५ रोजी मौजे : बेलपाडा, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.मोरेश्वर पांडु उर्फ पांडुरंग ठाकूर यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती सिडकोने संपादीत केल्या आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**

**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नाव / अवॉर्ड युनिट केस नं. | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | हे.आर. |
|---|---|---|
| जसखार १४५ | २२८/९ | ०-६-६ |
| | २४३/३ | ०-९-१ |
| | २४४/१० | ०-६-३ |
| | २४५/२ | ०-२-३ |
| | २४७/१० | ०-८-८ |
| | २४८/६ | ०-२०-७ |
| | २५२/९ | ०-११-९ |
| | २५३/१२ | ०-८-१ |
| | २६५/९ | ०-१२-६ |
| | २७०/४ | ०-६-६ |

सदर मिळकतीच्या संपादनाच्या मोबदल्यात जे.एन.पी.टी. / सिडको कडून १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर मिळणाऱ्या भूखंडामध्ये कै.मोरेश्वर पांडु उर्फ पांडुरंग ठाकूर यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नावं कमी करून सदर भूखंडावर त्यांचे वारस अर्जदार १) सौ.सावित्री दामोदर गोंधळी रा.बामणडोंगरी, ता.उरण, जि.रायगड २) सौ.भारती तज्ञेश म्हात्रे रा.फुंडे, ता.उरण, जि.रायगड ३) श्री.पंढरीनाथ मोरेश्वर ठाकूर, रा.जासई, ता.उरण, जि.रायगड हेच कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांची नावे त्याच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्ड वर येणे गरजेचे झाले आहे. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याचा निवाडा जाहीर करून घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सबब सदर कारणकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारस दाखला मिळण्याकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.७०/२०२० अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**



## शुद्धीपत्रक

तमाम जनतेस कळविण्यात येते की, दैनिक रायगड नगरीच्या दि.२६/०८/२०२१ रोजीच्या अंकामध्ये पान नं.३ वर सहा.अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर, पनवेल कोर्ट मा.भाकरे सो., अर्जदार तर्फे वकील ॲड.सुरज गोंधळी यांच्या नावाने प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीसमध्ये नजरचुकीने **अर्जदार नं.४/१) कै.दर्शना विश्वनाथ म्हात्रे** असे प्रसिद्ध झाले आहे, तरी सदर **अर्जदार नं.४/१) कु.विकास विश्वनाथ म्हात्रे** असे वाचण्यात यावे, ही विनंती.

**-: व्यवस्थापक**



श्री.भाकरे सो.कोर्ट

अर्जदारांतर्फे वकील : श्री.प्रियेश नाईक

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०८८/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.०१/१०/२०२१

श्रीमती.इंदूमती सदानंद पाटील
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रांजणपाडा, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) सौ.प्रतिमा स्वप्नील पाटील
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.३०५, ३ रा मजला, आत्माराम बिल्डींग,
प्लॉट नं.२८२, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.श्रद्धा प्रितम ठाकूर
वय वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.२००१, श्री विंग, क्लाउड ३६, प्लॉट नं.६,
सेक्टर ११, घणसोली, नवी मुंबई ४००७०१
३) कु.तृप्ती सदानंद पाटील
वय : वर्षे, धंदा : नोकरी
रा.रांजणपाडा, ता.उरण, जि.रायगड
सध्या राहणार
रा.फ्लॅट नं.३०५, ३ रा मजला, आत्माराम बिल्डींग,
प्लॉट नं.२८२, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ ही मयत सदानंद पांडुरंग पाटील यांची पत्नी आहे. तसेच सामनेवाला नं.१ ते ३ ह्या मयत सदानंद पांडुरंग पाटील यांच्या मुली आहेत. कै.मयत सदानंद पांडुरंग पाटील हे दि.२०/०७/२०२० रोजी मौजे : जुने सांगवी, पिंपरी चिंचवड, औध कॅम्प, जि.पुणे येथे मयत झाले आहेत. कै.सदानंद पांडुरंग पाटील यांचे वडील कै.पांडुरंग हिरु पाटील हे दि.१५/०५/१९९१ रोजी मयत झाले आहेत. अर्जात नमूद केलेल्या अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत सदानंद पांडुरंग पाटील यांना कोणीही वारस नाहीत. मयत सदानंद पांडुरंग पाटील यांचे नावे मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत होती. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे.

''सदनिका क्रं.७, क्षेत्र ४९.८१ चौ.मी., दुसरा मजला, बिल्डींग नं.J-1 प्लॉट नं.२२, सेक्टर १५, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, तसेच मयत सदानंद पांडुरंग पाटील यांचे सामाईक नावे मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड येथे खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती होत्या त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| जासई २०/९८ | १७ | १ ड | ०-१३-९ | |
| जासई १६२/१५५ | २१ | २ (२) | ०-२२-३ | |
| | २३३ | १४ | ०-१९-५ | |
| | २३३ | ९ | ०-१४-९ | |
| | २३४ | २ | ०-२२-० | |
| | १६ | ५ | ०-००-२ | |
| | १२ | ३ | ०-४२-१ | |
| | १७ | १ अ | ०-३५-३ | |

सदर जमीन मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत झाली आहे. सदर संपादीत जमिनीमध्ये अर्जदार हे वरील मिळकती संबंधात मयत सदानंद पांडुरंग पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकतीमध्ये ह्या मिळकतीच्या हिश्श्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्ती हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटी प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये व मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कारवाई करेल व ते अर्जदार मयत सदानंद पांडुरंग पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२०/०८/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Adv. Yogendra Pratap Singh

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF THE CIVIL JUDGE (S.D.) THANE
CIVIL M.A.NO.1067 OF 2021
Exhibit No.5
Next Date : 6/10/2021

1. Sandeep Prakash
Son of Shri Satya Prakash Srivastava, Age-51 yrs, Occ. Business, Hindu, residing in Flat No. 1101, Building No. 57, Seawoods Estate CHS Ltd. Phase-II NRI Complex, Sector-54/56/58, Palm Beach Road, Nerul, Navi Mumbai-400703.
Mobile No. 9833669662
E-mail : singh.vp71@gmail.com
2. Aarushi Prakash
Daughter of Shri Sandeep Prakash Age - 17 yrs, Occ.: Student, Hindu, residing in Flat No. 1101, Building No. 57, Seawoods Estate CHS Ltd. Phase-II NRI Complex, Sector-54/56/58, Palm Beach Road, Nerul, Navi Mumbai-400703.
3. Adhrit Prakash
Son of Shri Sandeep Prakash, Age - 09 yrs, Occ: Student, Hindu, presently residing in Flat No. 1101, Building No. 57, Seawoods Estate CHS Ltd. Phase-II NRI Complex, Sector-54/56/58, Palm Beach Road, Nerul, Navi Mumbai-400703. ...Applicants

Versus

Nil

That the wife of Applicant No. 1 and mother of Applicant No. 2 & 3 Late Mrs. Kinnari Prakash, who died intestate on 05 th May 2015 at Mumbai and the above-named Applicants have filed the present Misc. Application for grant of Succession Certificate under Section 372 of the Indian Succession Act, 1925, in the Court of Civil Judge (S.D.), Thane for the property mentioned in the Schedule herein below.

**SCHEDULE OF PROPERTY**
**DEBT AND SECURTIY**

| Sr. No. | Description | VALUE IN INR |
|---|---|---|
| 1 | Money lying in Bank Account No. 2104 1150 0000 0614 of the deceased Mrs. Kinnari Prakash in Karur Vysya Bank, Vashi Branch, being the Proprietor of M/s impressionists. | 12,60,590.00 |
| 2 | Equity Shares held under DP ID No. IN303719 Clint ID-10262239 The description is as follows: (i) Coal India Limited - 37 (ii) Edelweiss Financial Services Limit - 37 (iii) Lakshmi Energy and Foods Limited - 24 (IV) Power Grid Corporation of India Limited - 65 | 29,051.00 |
| 3 | Mutual Funds held under DP ID No. IN303719 Clint ID- 10262239 - The description is as follows: (i) HDFC Top 100 Fund -Regular Plan Growth - Folio No.-7908771 - 123.858 units. (ii) SBI Magnum Tax Gain Scheme Regular Plan -Dividend-Folio No.- 10713942 - 397.055 units. | 78,014.00 |
| 4 | Aditya Birla Sun Life Tax Relief Dividend Regular Plan (ARN Code-0703). Folio No. 1013506343. | 6,000.00 |
| 5 | Aditya Birla Sun Life Unclaimed Dividend Direct Growth Plan - ARN - Direct-Folio No. 1013506343. | 575.00 |
| | TOTAL VALUE | 13,74,230.00 |

(Rupees Thirteen Lakh Seventy Four Thousand Two Hundred Thirty Only)

You the members of public are hereby given notice to appear in the Court of Civil Judge (S.D.) Thane, in person or by pleader duly instructed for filing your statement/objections, if any within 30 days from the date of publication of this notice. Failing which, the said Application shall be heard presuming that there is no objection from anybody and the Application shall be finally decided.

Given under the hand and seal of the Court on this 30 day of August 2021

Sd/- Clerk Civil Judge (S.D.) Thane — Court Seal — Sd/- Superintendent Civil Judge (S.D.) Thane

# संक्षिप्त...

## जिल्हा परिषदेच्या गणेशोत्सव स्पर्धेतील नियम शिथिल करण्यात यावेत : मदन हणमंते

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हा परिषदेतर्फे आयोजित गणेशोत्सव स्पर्धेतील नियम शिथिल करण्यात यावेत.अशी भावना ज्येष्ठ पत्रकार मदन हणमंते यांनी व्यक्त केली आहे.

यंदा साजरा केला जाणा-या गणेशोत्सवात सामाजिक जाणीव जागृती व प्रबोधनाची श्रेष्ठ परंपरा पुढे नेण्याच्या दृष्टीने कोविड काळात नियमांचे पालन करण्यात येऊन सामाजिक भावनेने रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागामार्फत गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन दि.९ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२१ या कालावधीत करण्यात आले आहे.

या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध गणेशोत्सव मंडळे, सामाजिक संस्था तसेच वैयक्तिक स्तरावरील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

पर्यावरण रक्षण, निसर्ग संवर्धन,परिसर स्वच्छता व आरोग्यासाठी चांगल्या सवयी लावून गावपातळीवर अधिकाधिक लोकसहभाग घेऊन निर्मल वातावरणात पर्यावरण स्नेही गणेशोत्सव साजरा करणे हा या स्पर्धेचा उद्देश असून उपक्रम छान आहे.

मात्र या स्पर्धेसाठी ठेवण्यात आलेले नियम खूप किचकट आहेत. यावर्षी जिल्ह्यातील एकूण सार्वजनिक गणपती-२८५ व खाजगी-९९८९७ यात दिड दिवसाचे सार्वजनिक-१९व खाजगी-२५५१२, गौरी गणपती - सार्वजनिक-८१, खाजगी-५६४६०तर अनंत चतुर्दशी चे सार्वजनिक-१६० व खाजगी-१७१९५ असे रायगड जिल्ह्यामध्ये पाच लाख खाजगी गणपती आहेत व सार्वजनिक फक्त २९० गणपती आहेत मुरुड, माडवा म्हसळा दिघी १रेवदंडा २ असे आहेत.

जिल्हास्तरावर रायगड जिल्हा परिषदेतर्फे यंदा आयोजित करण्यात आलेल्या गणेशोत्सव स्पर्धेतील नियम शिथिल करण्यात यावेत. अशी भावना ज्येष्ठ पत्रकार मदन हणमंते यांनी व्यक्त केली आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

### कोलाड विद्युत महामंडळाचा कहर सुरू


# एक महिना विद्युत बिल थकीत पुरवठा खंडित करण्याचा इशारा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

ग्रामीण भागातील जनता महागाईच्या कोंडीत त्यात विद्युत महामंडळाचा भरमसाठ वीजबिल त्या बिलांवर करांवर कर त्यात गेली दीड दोन वर्षे कोरोनासंकट तद्नंतर मोठं चक्रीवादळ मागील पावसाळ्यात अनेकदा महापुर अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे पीक वाया गेले तसेच त्यातच सर्व सामान्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले महागाईने कळस गाठला ग्रामीण भागातील अनेक मजुरांचा रोजगार गेला, व्यवसाय बुडाला हातकमाई देखील गेली त्यामुळे सामन्यांचे वीज कनेक्शन तोडू नका. बिलासाठी सक्ती करू नका यासाठी राज्याचे विरोधीपक्ष नेते तथा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वमान्य जनतेची व शेतकऱ्यांची वीज खंडित करू नका म्हणून राज्याच्या विधानसभेत तातकालीन झालेल्या अर्थसंकल्पात मागणी केली यासाठी राज्यात ठिकठिकाणी आंदोलने देखील केली गेली.

शहरी भागासह ग्रामीण भागातील शेकडो ग्राहकांना प्रचंड रक्कमेची वीज बिले आज देखील करांवर कर लावून येत आहेत कोणाला हजार पाच हजार तर काहींची अधिकच यावर हद नाही त्यातच वीज महामंडळ विभागीय अधिकारी व कर्मचारी मंडळींचा दारावर येऊन तगादा वीज बिल भरा अन्यथा पुरवठा खंडित ही मोहीम हाती घेऊन गरीब गरजूंवर अन्यायाचा हातोडा मारण्याचा काम कोलाड विद्युत महामंडळ करत असल्याने सर्वत्र एकच संताप व्यक्त होत आहे .

कोरोना काळ सुरू झाल्यापासून चारही बाजूने ग्रामीण जनतेसह शेतकरी वर्गाला वेठीस धरण्याचा काम अधिक सरकारकडून तसेच त्यांच्या अधिकारी वर्गाकडून सुरू आहे की काय असा संतप्त सवाल उठला आहे एकीकडे महागाईचा कळस तर दुसरीकडे शाळांची फी वसली थकीत त्यातच भरमसाठ वीजबिल यांनी साऱ्यांचे कंबरडे मोडले कोरोनाशी सामना करता करता आता नागरिकांना महागाईशी सामना करावा लागतो त्यात वीजबिल न भरल्याने पुरवठा खंडित करण्याचा अधिकारी मंडळींचा जोशाचा तगादा शेतकऱ्यांना भात शेती लागवडीला सामोरे जावे लागत आहे इंधन वाढल्याने आधुनिक काळातील शेतीची नांगरणी न परवडणारी मजुरांची कमतरता त्यात मजुरी देखील वाढली त्यांच्या भाताची किंमत कवडी मोलाची त्यात बी बियाणे व रासायनिक खतांची देखील किंमती वाढल्या एक ना अनेक संकटाला ग्रामीण भागातील जनतेला सामोरे जावे लागत आहे .



कोरोना बसला मानेवर महागाई बसली उरावर मुलांच्या शाळांची फी भरली नाही तर त्यांच्या शिक्षणाचा वर्ष फुकट विद्युत बिल भरला नाही वीज पुरवठा खंडित करण्याचा अधिकारी वर्गाचा तगादा त्यात पुढे गौरी गणपती उत्सव नागरिक झाले हतबल वा राजसा अजब तुझा सरकार कोरोनामुळे गेली दोन वर्षे रोजगराजी साधन नाहीत त्यामुळे अधिकच ग्रामीण भागातील नागरिकांना पैशाची चणचण त्यात कोलाड विभागातील वीज वितरण विभागतही वीज वाढीव बिलांचा सावळा गोंधळ सुरू आहे. सामान्यांच्या घरात दोन तीन बल्ब, एक फॅन असताना हजारोंची बिल येतातच कशी ? याबाबत वारंवार आश्चर्य व्यक्त झाले.

दुसरीकडे अनेक ग्राहकांना दोनतीन महिन्यांचे बिल दहा हजाराहून अधिक हे कसे वीज बिलांतून लूटमार सुरूच असल्याचे पुन्हा एकदा समोर आले. दरम्यान सर्वच ग्राहकांना भरमसाठ वीज बिले येत आहेत, ग्राहक वीज पुरवठा खंडिता पोटी निमूटपणे भरत आहेत. सामन्यांच्या वाढीव वीज बिलांबाबत कोणीच दखल घेत नसल्याने एकच संताप व्यक्त होत आहे.

राज्यात वीज बिलांबाबत सुसूत्रता नाही. वाढीव वीज बिलांची आतातर कोणी दखलही घेत नाहीत. झझनभर अधिभार कराने सामान्यजण अक्षरशः वैतगाला. या वास्तवात कोरोनाची भर पडल्याने भरमसाठ वीज बिले भरणार कशी ? ही गंभीर स्थिती असताना शेकडो ग्राहकांनी वीज बिले न भरल्याने वीज कनेक्शन तोडन्याचा हट्टाहास विद्युत त्यात एक महिना थकीतीवर देखील महामंडळाने हाती घेतला आहे. ग्रामीण भागातील रस्त्यावरील वीज कनेक्शनही तोडण्यात आले आहेत गावेच्या गावे आजतागत अंधारातच आहेत. मोठं मोठे उद्योजक व व्यवसायिक राजकारणी यांची किती थकीत ही केव्हांच सर्वसामान्य जनतेसमोर येत नाही मात्र महिन्याच्या शे पाचशे हजार थकीतीवर मात्र हातोडा मारत वीज कनेक्शन कट करण्याचा कारस्थान संबधित वर्गाकडून केला जातो या देशात व राज्यात सर्व सामान्य जनतेला कोणी वाळीच नाही का असा संतप्त सवाल जनसामान्यांकडून केला जात आहे.

## जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने मोफत आरोग्य शिबिर संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहावे व त्यांना डायबेटीस, रक्तदाब या सारख्या शारीरिक व्याधींची माहिती करून देण्याच्या दृष्टीने जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने 'आरोग्य सेविका आपल्या दारी ' या कार्यक्रमांतर्गत पनवेल मधील गावदेवी पाडा येथील परिसरात आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. सोमवार दि. ३० ऑगस्ट रोजी पनवेल शहरातील गावदेवी पाडा येथे हे शिबीर कोरोनाच्या शासकीय नियमांचे पालन करून राबविले गेले.

पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम दादा म्हात्रे ह्यांच्या मार्गदर्शना खाली हा उपक्रम राबवित आहेत. ह्यावेळी गावदेवी पाडा येथील श्री स्वामी समर्थ मठाधिपती सुधाकर भाऊ घरत, श्री प्रकाश घरत, नरेश मुंढे, सुरज बहाडकर, मंगेश भोईर उपस्थित राहून तपासणी करून घेतली. यावेळी रक्तदाब, मधुमेह, ऑक्सिजन लेव्हल यांची तपासणी घरोघरी जाऊन करण्यात आली.

## चिंचपाडा-कोपर खाडी, खारघर खाडी व कासारभट, धोदाणी परिसरात बेकायदेशीररित्या होतोय रेती उपसा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील चिंचपाडा-कोपरखाडी, खारघर खाडी, कासारभट, धोदाणी परिसरात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या रेती उपसा होत असून तहसील कार्यालयातून या ठिकाणी कारवाई होत असल्या तरी स्थानिक पोलिसांच्या मार्फत ठोस उपाय योजना होत नसल्याबद्दल ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

कोपर गावच्या हद्दीत खाडी क्षेत्रातून मोठया प्रमाणात रेती उत्खननाचा तयारी करण्यात आली होती. विमानतळाच्या भरावावर साठवणुक कुंडया तयार करण्यात होते. याबाबतची माहिती पनवेल तहसीलदार यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे नायब तहसीलदार संजीव मांडे यांनी करंजाडे तलाठी सुवर्णा पवार यांना चिंचापाडा-कोपर खाडी परीसर, नवी मुंबई आंतरराष्टीय विमानतळालगत, महसुल विभागाचे गौण खनिजामधील वाळुची चोरी होत असल्याने कारवाई करण्यास सांगितले होते. त्यानुसार नायब तहसीलदार मांडे, तलाठी पवार, तलाठी सजा डी.एल. पवार यांच्यासह पनवेल शहर पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्याठिकाणी पाहणी केली असता बेकायदेशीरपणे खाडी सेक्शनपंपद्वारे बेकादेशीरपणे रेती उपसा करून रेतीची साठवण करण्यात आल्याचे या पथकाला दिसले. त्याचबरोबर येथे ३ अनोळखी इसम रेती उपसा करीत असल्याचे दिसले. व त्यांनी पथकाला पाहातच त्याठिकाणांवरून पळ काढला.

या कारवाईमध्ये एक बोट आढळून आली व ती तोडून खाडीमध्ये सोडण्यात आली. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये ३ अज्ञात इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशाच प्रकारे बेकायदेशीर रेती उपसा खारघर खाडीत, धोदाणी,कासारभट आदी भागात मोठ्या प्रमाणात सुरू असतानाही येथील कारवाया का थंडावल्या? असा सवाल स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत.

## टेनिसपटू आकांक्षाचा प्रितम म्हात्रे यांनी केलेला सत्कार, ऑलिंपिक स्पर्धेसाठी दिल्या शुभेच्छा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलची कन्या कु.आकांक्षा निटुरे हिने चेन्नई येथे झालेल्या टेनिस हब एमपीटीए नॅशनल ज्युनिअर अंडर १८ क्ले कोर्ट टेनिस चॅम्पियनशिपमध्ये एकेरी आणि दुहेरी राष्ट्रीय टेनिस स्पर्धेत दुहेरी मुकुट मिळवल्याबद्दल पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते, प्रितम जनार्दन म्हात्रे ह्यांनी जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या वतीने आणि शेकापच्या वतीने सन्मान चिन्ह देऊन अभिनंदन केले.



ह्यावेळी आकांक्षा चे वडील दिलीपकुमार निटुरे आणि आई दीपा दिलीप निटुरे ह्यांचे देखील अभिनंदन केले. आकांक्षा बद्दल बोलताना तिच्या वडिलांनी सांगितले रोज ती बारा तास प्रॅक्टिस करते. लहानपणापासून आम्ही तिच्यामध्ये टेनिस ची आवड पाहिली आणि आम्ही ठरविले की मुलीला शिक्षणापेक्षा क्रीडा क्षेत्रात जास्त आवड आहे तर तिच्या आवडीच्या विषयात मध्येच आम्ही तिला प्राधान्य दिले आणि आज तिने तिच्या मेहनतीच्या जोरावर यापुढे होणाऱ्या ऑलिंपिक साठी भारतातर्फे जाण्याची तयारी केलेली आहे. तिला आज पर्यंत वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये एकूण ७७ ट्रॉफी मिळाल्या आहेत. आज आकांक्षा ज्या पद्धतीने खेळत आहे तिची मेहनत पाहता ती नक्कीच ऑलिम्पिकमध्ये यश मिळवून आपल्या देशाचे नाव उज्वल करेल अशा शुभेच्छा प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी दिल्या. मोठ्या स्पर्धेकरिता लागेल ती मदत देखील मिळवून देण्याचे आश्वासन प्रितम म्हात्रे ह्यांनी आकांक्षाच्या कुटुंबियांना ह्यावेळी दिले.

## १५ वर्षीय मुलीचे अश्लील फोटो व्हायरल करणाऱ्या आरोपींना उत्तर प्रदेश मधून अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**


सोशल मीडियावर १५ वर्षीय मुलीचे अश्लील फोटो व्हायरल करून तिची बदनामी करणाऱ्या दोन आरोपींना उत्तर प्रदेश येथून अटक करण्याची कामगिरी तळोजा पोलिसानी केली आहे. मोहम्मद आरिफ मनीर अहमद (२२) आणि यासीन अहमद नसिरुद्दिन अहमद (२२) अशी या आरोपींची नावे असून त्यांनी गत जून महिन्यामध्ये पीडित मुलीचे फोटो व्हाट्सअप वरून वायरल केले होते.



या घटनेतील पीडित १५ वर्षीय मुलगी मूळची उत्तर प्रदेश राज्यातील असून तिचे वडील तळोजा येथे कामानिमित्त राहण्यास आहेत. गत जून महिन्यामध्ये पीडित तरुणी तळोजा येथे राहणार्या वडिलांकडे आली होती. त्यावेळी तळोजा भागातील काही तरुणांच्या व्हाट्सअप ग्रुपवर पीडित मुलीचे नग्न व अश्लील फोटो व्हायरल झाले होते. ही बाब पीडित मुलगी व तिच्या कुटुंबीयांच्या लक्षात आल्यानंतर पीडित मुलीच्या वडिलांनी तळोजा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात आरोपी विरोधात पॉक्सो सह विविध कलमांद्वारे गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली होती. या प्रकरणाच्या तपासासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक काशीनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. ज्या व्हाट्सअप ग्रुप वर पीडित मुलीचे फोटो व्हायरल झाले होते, त्या व्हाट्सअप ग्रुपच्या मदतीने पोलिसांनी तांत्रिक तपास केला असता, सदर आरोपी उत्तर प्रदेश राज्यात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सहाय्यक पोलिस निरीक्षक सोपान नांगरे, पोलीस नाईक विजय पाटिल, निवृत्ती चंदेवाड, वैभव शिंदे यांचे पथक उत्तर प्रदेश येथे रवाना करण्यात आले होते. सदर पथकाने उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांना उत्तर प्रदेश मधील बलिया जिल्ह्यातून वेगवेगळ्या ठिकाणावरून अटक केली. न्यायालयाने या दोन्ही आरोपींना सात दिवसाची पोलीस कोठडी ठोठावली आहे.

### पाली बस स्थानकाजवळील 'त्या' धोकादायक

# स्लॅब फोडलेल्या नाल्यात बाईकस्वार पडून जखमी



**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली एसटी स्थानकाजवळ असलेल्या स्लॅब फोडलेल्या नाल्यात सोमवारी (ता.३०) एक बाईकस्वार पडून जखमी झाला आहे. अनेक महिन्यांपासून उघडा व धोकादायक स्थितीत असलेल्या या नाल्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

हा बाईकस्वार नाल्याशेजारी रस्त्यावर उभा असतांना दुसऱ्या गाडीला जागा देत होता त्यावेळी तोल जाऊन नाल्यात पडला. आजूबाजूच्या लोकांनी बाईक व बाईकस्वाराला अथक प्रयत्नांनी बाहेर काढले. मागील वर्षी ५ नोव्हेंबरला स्थानकात तुंबलेले सांडपाणी काढण्यासाठी तत्कालीन ग्रामपंचायतीने परिहन मंडळाच्या परवानगीने हा नाला व त्यावरील स्लॅब तोडला होता. मात्र तब्बल साडे नऊ महिने उलटून गेले तरी या नाल्यावर स्लॅब टाकण्यात आलेला नाही. तत्कालीन ग्रामपंचायतीने सांगितले होते की हा नाला दुरुस्त करण्याची जबाबदारी परिवहन मंडळाची आहे. मात्र परिवहन मंडळाने त्यावर कोणतीही भूमिका घेतली नाही. त्यानंतर काही महिन्यांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने पाली ग्रामपंचायतचे नगरपंचतीमध्ये रूपांतर झाले. आणि प्रशासकांकडे कारभार आला. हा नाला नगरपंचायतीच्या माध्यमातून बांधण्यात येईल असे प्रशासक दिलीप रायण्णावार यांनी सांगितले होते. मात्र अजूनही हा नाला जैसे थे आहे. स्लॅब नसल्याने नाला धोकादायक झाला आहेच. शिवाय येथील सांडपाणी व दुर्गंधी यामुळे स्थानकात येणारे प्रवासी, आजुबाजूचे दुकानदार व नागरीकांचे आरोग्य देखील धोक्यात आले आहे.

> या नाल्याच्या दुरुस्ती संदर्भात निविदा काढण्यात आली आहे. लवकरच हे काम पूर्ण होईल.
> **दिलीप रायण्णावार, प्रशासक, पाली नगरपंचायत**

> या धोकादायक नाल्यामुळे अशाप्रकारे अनेक अपघात घडण्याची शक्यता आहे. शिवाय येथील घाण व दुर्गंधीमुळे प्रवासी व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे या नाल्यावर लवकर स्लॅब टाकण्यात यावा.
> **प्रकाश पालकर उपाध्यक्ष (सुधागड वंचित सामाजिक विकास संस्था)**

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी दिली जिल्हा सामान्य रुग्णालयास भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आज (दि. ३० ऑगस्ट) रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग येथे प्रत्यक्ष भेट दिली व येथील कामकाजाचा तसेच अडचणींचा आढावा घेतला.

तज्ञांच्या मते कोविडची संभाव्य तिसरी लाट उद्भवू शकते. या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य यंत्रणेने खबरदारीच्या उपाययोजनांबाबत नेमकी काय तयारी केली आहे, या तयारीच्या अनुषंगाने आणखी काय उपाययोजना करणे आवश्यक आहे, ऑक्सिजन पुरवठाबाबत काय तयारी आहे, आरोग्य यंत्रणेच्या काय अडचणी आहेत, या सर्व बाबींचा सविस्तर आढावा जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या पाहणी दरम्यान घेतला.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने,अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल फुटाणे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, तहसिलदार विशाल दौंडकर, अलिबाग तहसिलदार सचिन शेजाळ, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.गजानन गुंजकर,आरटीपीसीआर लॅबच्या समन्वयक डॉ.शितल जोशी घुगे, मेट्रन श्रीमती भोपी आदी उपस्थित होते.

